# मार्गदर्शक सूचना

## राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत

## कोरडवाहु शाश्वत शेती कार्यक्रम २०१२-१३

**प्रस्तावना**

**१.१** पर्यावरण, कृषि उत्पादकता आणि लाखो ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकांचे दृष्टीने पर्जन्याधारित कृषि उत्पादन असणा-या क्षेत्रास भारतामध्ये विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. देशाच्या उत्पादक जमिनीपैकी/क्षेत्रा पैकी ७५ टक्के क्षेत्र या प्रकारामध्ये मोडते. पर्जन्याधारित शेती ही अत्यंत जोखमीची आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तथापि या क्षेत्रावर लक्ष्य केंद्रीत केल्यास कृषि उत्पादनात मोठी वाढ साध्य करता येईल.

**१.२** एकात्मिक शेती पध्दतीतून कृषि क्षेत्राचा सर्वांगिण विकास केल्यास अन्नधान्य, फळे, फुले, पशुधन, कृषि वानिकी, आणि मत्स्यव्यवसाय आणि कृषि पुरक उद्योगधंदे यांची सांगड घालणे सहज शक्य होईल.

प्रस्तावित कार्यक्रमामध्ये कृषि सलग्न विविध क्षेत्रांच्या क्षमतेचा विकास करतांना नैसर्गिक साधन संपत्तीचा जास्तीत जास्त वापर करणे हा मुळ उद्देश आहे. नैसर्गिक साधन संपत्ती तसेच शेतकरी आणि मग्रारोहयो, राष्ट्रीय कृषि विकास योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि विविध पाणलोट उपचारातून निर्माण झालेल्या सुविधांचा क्षमता वापरल्या जातील. यामुळे उत्पादकता वाढविणे, लहरी हवामानांचे नुकसान टाळणे, अन्न सुरक्षा, ग्रामीण उपजिवीका व ग्रामीण जनतेस सुरक्षित मिळकत या बाबी साध्य करण्यास हातभार मिळेल.

**२.१. उद्देश** :-

शेतक-यांच्या विशेषतः प्राधान्यानं अंत्यल्प व अल्प भुधारक शेतक-यांना उत्पादकता वाढ व उपजिविकांची साधने उपलब्ध करुन त्यांचे जीवनमान उंचावणे.

**२.२**

अ) पर्जन्याधारित क्षेत्रातील कृषि उत्पादकतेत शाश्वत वाढ करणे.

ब) निरनिराळया व एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करुन दुष्काळ, पुर व इतर लहरी पाऊसमान यामुळे होणारे नुकसान टाळणे.

क) अद्ययावत उत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करुन शाश्वत रोजगार उपलब्ध करणे.

ड) पर्जन्याधारित क्षेत्रातील शेतक-यांच्या मिळकतीमध्ये व उपजिवीकांच्या साधनामध्ये वाढ करुन जीवनमान उंचावणे.

इ) आवश्यक असलेल्या सर्व योजनांचे एकत्रिकरण करुन एकात्मिक शेती पध्दतीव्दारे संसाधनांच्या क्षमतेचा परिपूर्ण वापर करणे.

**३ कार्य/धोरण** :-

३.१ बहुवार पीकपध्दती, पीक बदल, आंतरपीक पध्दती यांचा वापर तसेच फळपिके, पशुधन, मत्स्यव्यवसाय मधमाशीपालन इ. घटकांचा वापर करुन शेतक-याला शाश्वत जीवनमान देण्याबरोबरच नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यास/तोंड देण्यास सक्षम करण्यांत येईल.या कार्यक्रमातील शेती पध्दतीमध्ये किमान मशागत/कमीत कमी मशागत पीक बदल इ. कार्यपध्दतीमुळे जमिनीचा -हास टाळण्यात येईल. त्यामुळे निविष्ठांचा परिपूर्ण वापर व पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल.

३.२ नैसर्गिक संसाधने/सुविधा/निविष्ठा यांचा विचार करुन प्रत्यक्ष परिस्थितीनुसार पिके फळे, भाजीपाला, मसाला पिके, चारापिके, फुलशेती, पशुधन, मत्स्यव्यवसाय, मधुमक्षिकापालन, आळींबी उत्पादन, सुंगधी व औषधी पिके यांची लागवड व प्रक्रिया उद्योगांना सहाय्य करण्यांत येईल. त्या बरोबरच शेततळी, जमीन मशागत, विहीरी पंपसेट, सुक्ष्म सिंचन, बियाणे व कलमे/रोपे इ. बाबीसाठी सहाय्य करण्यांत येईल. यामुळे शाश्वत शेती पध्दती विकसित होईल.

## ३.३ कार्यक्रमाचे प्रमुख घटक :-

१. विशेषतः **अत्यल्प व अल्प भूधारक शेतकरी** केंद्र बिंदू मानून बहुस्त्रोत शेती पध्दतीस (शाश्वत) चालना देण्यांत येईल. ज्या योगे शेतक-यांची उपजिवीका अबाधित राहण्यास मदत होईल.

२. सामाईक संसाधनांचा परिपूर्ण वापर करण्याकरिता किमान ५० हे क्षेत्रावरील गट स्थापन करुन प्रकल्पाधारित उत्पादन पध्दती राबविण्यांत येईल.

३. जे शेतकरी त्यांची सध्याच्या शेतीपध्दतीमध्ये नवनवीन पध्दतीचा अवलंब करण्यास तयार असतील अशा शेतक-यांना या कार्यक्रमांर्गत सहाय्य करण्यांत येईल. या शेतक-यांमध्ये प्रकार **'अ'** (परिशिष्ट १ मधील १ ते ६ घटक) मधील विविध बाबीचा अवलंब करण्याची क्षमता असेल असे शेतकरी या कार्यक्रमासाठी पात्र ठरतील. स्थानिक परिस्थितीनुरुप या घटकांपैकी दोन किंवा अनेक घटकांची मिळून शेती पध्दती स्विकारण्याची मुभा या शेतक-यांना राहिल. या करिता स्थानिक कृषि केंद्रे, कृषि विद्यापीठ, राष्ट्रीय कृषि संशोधन संस्था, इक्रिसॅट, आत्मा या संस्थांचे सहाय्य शेतक-यांना घेता येईल.

४. विशिष्ट भागातील कृषि हवामानानुसार या कार्यक्रमातील घटकांमध्ये बदल होईल. या कार्यक्रमांत प्रत्येक शेतकरी कुटुंबास जास्तीत जास्त २ हेक्टर पर्यंत समशितोष्ण (सेमीअेरीड) भागात रु.१ लाख तसेच अशंतः दमट (हयुमिड) हवामान भागात रु.८० हजारपर्यंत सहाय्य करण्यांत येईल. या कार्यक्रमांतर्गत बहुतेक शेती पध्दतीमधील घटक जरी परिशिष्ट १ मधील तपशीलानुसार ठरविण्यांत आले असेल तरी कोणत्याही शेतक-यांस त्यापेक्षा जास्त सहाय्य मागता येणार नाही. तथापि शेतक-यांची शेततळी दुरुस्ती/बांधणी तसेच पॉलीहाऊस उभारणी इ. बाबी या अटीतून वगळयांत आले आहे. अतिरिक्त रक्कमेकरिता कर्ज उभारणी करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे.

५. शेतक-यांच्या खाजगी कंपन्या, नोंदणीकृत शेतकरी संस्था व शेतकरी सहकारी संस्था निर्मीतीसाठी कार्यक्रमात भाग घेता येईल. अशा वेळी प्रत्येक सदस्यास स्वतः शेतकरी गृहीत धरुन वरनमूद केल्याप्रमाणे मर्यादेत करण्यांत येईल. याबाबतीत शेतक-यांचे हक्क व मालकी विषयी नियमांचे उल्लंघन होणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे.

६. शाश्वत शेती पध्दतीची उपयोगिता वाढविण्याकरिता पाणलोट विकास/ मग्रारोहयो यामधून निर्माण झालेल्या सुविधा पाणी व्यवस्थापनेच्या सुधारीत पाट पध्दतींचा एकांत्मिक पध्दतीने वापर केला जाईल.

७. ज्या जमिनीमध्ये पाणी झिरपण्याचे प्रमाण जास्त आहे अशा जमिनीवरील शेतक-यांना अस्तरीकरणाचे सहाय्य या कार्यक्रमातून करण्यांत येईल.

८. जमिन सपाटीकरण, बांधबंदिस्ती, समतल चर, आच्छादन, सरीवरंबा, अर्धगोलाकार बांध, मशागत पध्दती इ. घटकांना सहाय्य करुन पाणी व्यवस्थापन व मुलस्थानी जलसंधारण या बाबींना सहाय्य करण्यांत येईल.

९. शेतकरी गट, शेतकरी संस्था व शेती सलग्न संस्था यांचे माध्यमातून शेती **औजारे बँक** विकसित करुन यांत्रिकीकरणाला सहाय्य करण्यांत येईल.

१०. बियाणांची गरज भागविण्याकरिता उत्पादन संघटना/राज्यशासन/कृषि विद्यापीठे यांना मुलभूत बियाणे, प्रमाणित बियाणे व पैदासकार बियाणे तयार करण्याकरिता सहाय्य करण्यांत येईल.

११. कमी उंचीच्या पॉलीहाऊसमध्ये कलमे/ रोपे तसेच भाजीपाला व फुले घेण्याकरिता शेतक-यांना सहाय्य करण्यांत येईल.

१२. शेती उत्पादन साठवणूक, सुविधा व मुल्यवृध्दी करिता प्रक्रिया करण्यास शेतक-यांना सहाय्य करण्यांत येईल.

१३. भारतीय कृषि संशोधन केंद्र, कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र व **एफएमटीटीआयएस** आणि राज्य स्तरीय प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत कार्यक्रमाशी संलग्न घटकांचे प्रशिक्षण व कौशल्यवृध्दी वाढविण्या करिता सहाय्य करण्यांत येईल.

## ४ कार्यक्षेत्र :-

**४.१** संपूर्ण पर्जन्याधारित क्षेत्र **(हमखास सिंचन स्त्रोताखाली न येणारे क्षेत्र)** मोठया प्रमाणात लागवडी योग्य जमिनीचा अंतर्भाव असलेले आणि कृषि उत्पादकता वाढीची सर्वाधिक क्षमता असलेल्या संपूर्ण क्षेत्राचा पर्जन्याधारित क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये समावेश आहे. यामध्ये (Semi-Arid)&(Sub-Humid ) पर्जन्यक्षेत्राचा कृषि परिसंस्थांचा प्राधान्य क्रमाने समावेश होईल.

**४.२** लागवडी योग्य क्षेत्राच्या ६० टक्के पेक्षा कमी क्षेत्र सिंचनाखाली असलेल्या आणि शुष्क (३१) दुष्काळी (१३३), आर्द्रता (१७५), कृषि परिसंस्थाना प्रभाव असलेल्या जिल्हयांना पर्जन्याधारित क्षेत्र विकास कार्यक्रमात प्राधान्य देण्यांत येईल. केरळ आणि ईशान्यकडील मागास जिल्हे (८५) या ठिकाणी लागवडीखालील क्षेत्राच्या ३० टक्केपेक्षा कमी क्षेत्र सिंचनाखाली आहे. अशा आर्द्रक कृषि परिसंस्थेच्याही या कार्यक्रमामध्ये समावेश होईल.पर्जन्याधारित क्षेत्र विकास कार्यक्रमात समावेशासाठी निवडलेल्या/पात्र ठरजेल्या जिल्हयांची यादी सोबतच्या परिशिष्ट क्र.२ मध्ये दर्शविले आहे.

**४.३** निवडक एकात्मिक शेती पध्दतीतील उपक्रमांच्या अंमलबजावणीची प्रस्तावित क्षेत्र खालील प्रमाणे.

अ) पाणलोट क्षेत्राखाली विकसित झालेले क्षेत्र.

ब) म.ग्रा.रो.ह.यो./जलसंधारण मंत्रालयांतर्गत जलस्त्रोत सुधारणा कार्यक्रम किंवा इतर अनुषंगिक कार्यक्रमांतर्गत जलस्त्रोतांचा विकास झालेले क्षेत्र.

क) नवीन पाणलोट क्षेत्रांतर्गत अथवा चालू पाणलोट विकासाच्या अनुषंगिक योजनेंतर्गत विकसित होणारे क्षेत्र.

ड) राफअ/राअसुअ/गतीमान कडधान्य विकास कार्यक्रम व राष्ट्रीय सुक्ष्मसिंचन अभियान कार्यक्रमांतर्गत विशिष्ट कृषि मालासाठी प्रोत्साहनपर कार्यक्रम राबविण्यांत येणारे क्षेत्र.

इ) नवनवनी शेती पध्दतीच्या विकासासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र.

## समाविष्ठ जिल्हे :-

| अ.क्रं. | भौगलिक विभागाचे नांवे | समाविष्ठ जिल्ह्याचे नांव |
|---|---|---|
| १ | समशितोष्ण | अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, धुळे, हिंगोली, जळगांव, जालना, लातुर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, चांगली, सोलापूर, वाशिम आणि यवतमाळ ( २० जिल्हे) |
| २ | सब - हयुमिड | चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, कोल्हापूर, नागपूर, पुणे, रायगड, सातारा, ठाणे आणि वर्धा (१० जिल्हे) |

**बाबनिहाय /घटकनिहाय कार्यक्रम सन २०१२-१३** (**Components of the Project**)

## Proposed Integrated farming system :-

| Sr. No. | Farming system | Pattern of assistance Rs. /ha. | Area proposed in ha. | No. of beneficiaries | Estimated cost (Rs. Crore) |
|---|---|---|---|---|---|
| | **A ) Diversified farming system :-** | | | | |
| 1 | Rice based Cropping system | 10000/- | 2000 | 5000 | 2.00 |
| 2 | Coarse cereal based Cropping system | 5000/- | 000 | 000 | 0.00 |
| 3 | Pulses based Cropping system | 5000/- | 2000 | 5000 | 1.00 |
| 4 | Fiber based Cropping system | 10000/- | 2500 | 5000 | 2.50 |
| 5 | Oilseed based cropping system | 7500/- | 2000 | 5000 | 1.50 |
| | **Total A** | | 8500 | 20000 | 7.00 |
| | **B ) Live stock based cropping system :-** | | | | |
| 6 | a. C.b. cows/ Buffalo + Mix farming Dairy<br>b. Small ruminants + mix farming<br>c. poultry | 40000/-<br>25000/-<br>25000/- | - | 2000<br>1000<br>1000 | 8.00<br>2.50<br>2.50 |
| | **Total B** | | | **4000** | **13.00** |
| | **Total A + B** | | **8500** | **24000** | **20.00** |

| Sr. No. | Name of Activity | Nos. | Units | No.of organization /Group individuals | Estimated Cost (Rs. Crore) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Seed Production Unit (individual Farmer) | 1400 | Ha. | 3500 | 3.50 |
| 2 | Farm Mechanisation Unit (SHGs,FIGs,KVM, Farmers Club) | 300 | No. | 100 units | 3.00 |
| 3 | In si tu soil moisture conservation | 1680 | Ha. | 3200 | 0.42 |
| 4 | Poly House | 10 | Ha. | 10 | 0.47 |
| 5 | Water management Activities | | | | |
| | a. Farm Pond (20X20X3m.) | 100 | No. | 100 | 1.20 |
| | b. Lining of Ponds constructed under NAREGA/WSDP | 300 | No. | 100 | 4.50 |
| | c. Bore Wells | 100 | No. | 100 | 0.25 |
| | d. Water lifting Devices (pump set) | 300 | No. | 100 | 0.30 |
| 6 | Post Harvest & storage small villages level storage/ packaging & processing unit. | 50 | No. | 50 Groups | 0.75 |
| 7 | Crop insurance | 8500 | Ha. | | 0.61 |
| | **Total B** | | | **7260** | **15.00** |
| | **Total A+B** | | | | **35.00** |

## १) गावाची निवड :-

**- सन २०११-१२ मध्ये निवडलेल्या गावाव्यतिरिक्त व गतवर्षिचा तालूका वगळून उपविभागातील भौगोलीक परिस्थीतीच्या मर्यादा विचारात घेऊन व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे अधिन राहून आपले उपविभागातून एक नविन गावाची निवड करावी सन २०११-१२ मध्ये निवडलेले गाव या प्रकल्पासाठी पुन्हाः घेऊ नये.**

- प्रत्येक उपविभागामध्ये १०० हे.क्षेत्राचा १ समुह या पध्दतीने एक समुह निवडण्यात यावा
- गावाची निवड करीत असताना उपविभागातील कोरडवाहु तालुक्याची निवड करण्यात यावी.
- सदरील तालुक्यामधील गावातील कोरडवाहु क्षेत्राचा टक्केवारी नुसार गावाची यादी तयार करावी
- ७५ टक्क्यापेक्षा जास्त कोरडवाहु क्षेत्र असलेल्या गावांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.
- पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या ७५ टक्क्येपेक्षा जास्त कामे झालेली आहेत अशी गावे निवडण्यात यावीत.
- मुलस्थानी जलसंधारण व शेततळे या बाबी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची काम पुर्ण करण्यास इच्छुक असणा-या गावांची निवड करण्यात यावी.
- कृषि विभागाच्या विविध योजनांमध्ये सक्रिय सहभाग असणा-या गावांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

## २) लाभार्थी निवडीचे निकष :–

- गावातील लहान शेतक-याची प्रथम प्राधान्याने निवड करावी
- अल्प, अत्यल्प,भु-धारक महिला व मागासवर्गीय शेतकरी असावा.
- पाणलोटातील माथ्याकडील बाजुचे क्षेत्रातील शेतकरी निवड करावी.
- कोणत्याही शाश्वत पाण्याची व्यवस्था नसणारा शेतकरी असावा.
- मुलस्थानी जलसंधारण व शेततळे या करीता म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत काम करण्यास तयार असणारा व जॉब कार्ड धारक असावा.
- या योजने अंतर्गत अपेक्षित असलेल्या शेतकरी स्वयंसहाय्यता गटामध्ये सहभागी होण्यास तयार असलेला शेतकरी असावा.
- शेती पध्दतीमधील मत्स्यव्यवसाय, पशुपालन, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, भाजीपाला उत्पादन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षीकापालन, हरितगृह इ. घटकापैकी कमीतकमी, दोन घटक अवलंब करण्यास तयार असणा-या शेतक-याची निवड करण्यात यावी.
- सुक्ष्म सिंचन पध्दती अवलंबण्यास तयार असणारा शेतकरी निवडावा.

## ३)कार्यक्रमाची अंमलबजावणी :-

- सदरील कार्यक्रम हा शेती पध्दतीवर अवलंबुन असल्यामुळे सुरुवातीस या कार्यक्रमाकरीता जिल्हयातील कृषि हवामान क्षेत्रावर आधारीत निनिराळया शेती पध्दती निश्चित करण्यात याव्यात.
- या करीता जिल्हास्तरावर कृषि उपसंचालक यांचे अध्यक्षतेखाली एक गट स्थापन करण्यात यावा.
- शेती पध्दती निश्चित करीत असताना विविध उपक्रमांचे जसे फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, रेशीमशेती, कुक्कुटपालन, प्रक्रीया उद्योग इ.वेगवेगळया उपक्रमांचे एकत्रिकरण करण्यात यावे.
- असे एकत्रिकरण करीत असताना शेतक-याकडे असणारी सरासरी जमीन धारणा, सध्या घेत असलेली पिके, शेतक-याकडे असणारे पुरक व्यवसाय,त्याला अवगत असलेले तंत्रज्ञान, त्याच्याकडील साधन संपत्ती व भांडवल, त्याच्या कुटुंबात उपलब्ध असलेले मजुर,सध्याच्या शेतीपध्दती व उपलब्ध असणारा वेळ व मनुष्यबळ, शेती उत्पादनास उपलब्ध बाजारपेठ, शेतक-याची भांडवल गुंतवणूक क्षमता,शेती व शेतीपुरक व्यवसायासाठी उपलब्ध शासन योजना या मुद्यांचा देखील विचार करावा.
- निनिराळया कृषि हवामान क्षेत्रावर आधारीत शेती पध्दतीवर कृषि विद्यापीठांमध्ये संशोधन झालेले आहे या संशोधनाचा देखील अशी शेती पध्दती ठरविताना आधार घेण्यात यावा.
- जिल्हयामधील विविध शेतीपध्दती ठरवित असताना कृषि विद्यापीठाच्या संशोधन केंद्राची व कृषि विज्ञान मंडळाची मदत घेण्यात यावी.

- निवडलेल्या गटामधील शेतक-यांकरीता या शेतीपध्दती मधील कोणतीही एक शेती पध्दत निवडण्याची मुभा देण्यात यावी.
- तसेच सन २०११–१२ मध्ये अस्तित्वात असलेली पशूधन खरेदी पध्दतीने, प्रकल्पासाठी आत्मा नियामक मंडळाची मान्यता घेणे, तसेच

## ४) कार्यक्रम अंमलबजावणी करीता विविध स्तरावरील जबाबदारी :-

- या कार्यक्रमाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी संबधित उपविभागातील **उपविभागीय कृषि अधिकारी** यांची राहील.
- या करीता उ.वि.कृ.अ. यांना या कार्यकमाचे **नोडल अधिकारी** म्हणुन नियुक्त करण्यात यावे.
- उ.वि.कृ.अ. कार्यालयातील तंत्र अधिकारी यांची कार्यक्रम समन्वयक प्रोग्रॅम को ऑर्डिनेटर (**Programme Co - ordinator**) म्हणुन नेमणुक करण्यात यावी.
- त्तथापि संबंधित **तालूका कृषि अधिकारी व निवड केलेल्या गावाशी संबंधित मंडळ कृषि अधिकारी** यांचेवर देखील प्रकल्पाची जबाबदारी देणेत येत आहे यामध्ये खालील बार्बीविषयी स्वतः हजर राहून त्यानी या प्रकल्पाची जबाबदारी पार पाडावयाची आहे

१. गावाचे पायाभूत सर्वेक्षण **(Baseline-Survey)** करीत असताना गावचे सभेस उपस्थित राहून सर्वेक्षण करावयाचे आहे.
२. गावाचा प्रकल्प आराखडा **(Project- Report)** तयार करणेकामी संपूर्णपणे सहभाग आवश्यक आहे.
३. तसेच प्रकल्पामध्ये राबवावयाचे घटक उदा.पाईप लाईन, बोअरवेल, पोली हाऊस, फार्म पोंड, सीड प्रॉडक्शन यूनिट, पंपसॅट, पीक विमा इ. सर्व घटकाबाबत प्रकल्पाचे/कार्यकमाचे नोडल अधिकारी तथा उ.वि.कृ.अ. यांना या प्रकल्पासाठी मदत करावयाची आहे.
४. पशूधन खरेदी तथा तत्सम प्रकारची खरेदी करावयाची असल्यास सदर प्रक्रियेमध्ये देखील **मंडळ कृषि अधिकारी व तालूका कृषि अधिकारी** यांनी वॅयक्तीकरित्या सहभाग घ्यावयाचा आहे.
५. प्रकल्पाचे सूरवातीपासूनच व्हिडीओ शूटिंग व फोटोग्राफी करावयाची आहे सदर कार्यक्रमाचे **(Documentation & Success story)** यशोगाथा तयार करावयाची आहे.

- सदरील कायक्रमामध्ये असलेल्या प्रशिक्षणाची सर्व जबाबदारी तंत्र अधिकारी (उ.वि.कृ.अ कार्यालय) यांची राहील.
- ज्या मंडल कृषि अधिकारी यांचे कार्यक्षेत्रात सदरील कार्यक्रम राबविण्यात येत आहे त्यांना सदरील कार्यक्रमाचे प्रकल्प व्यवस्थापक (**Project Manager**) म्हणुन नेमण्यात यावे.
- प्रकल्प व्यवस्थापक यानी लाभार्थी शेतक-यांची निवड करणे,अर्ज भरुन घेणे,लाभार्थीनी निव्डलेल्या शेतीपध्दतीनुसार त्यांना घ्यावयाचे विविध घटकनिहाय लाभाचे वेळापत्रक तयार करणे व त्यांना आवश्यक असणा-या प्रशिक्षण व अनुषंगिक गरजांची माहीती घेणे.
- या निवडलेल्या शेतक-यांचे स्वयंसहाय्यता गट (SHGs) स्थापन करण्यात यावेत. सदरील गटाचे कामकाज योग्य पध्दतीने चालण्यासाठी त्यांच्या ठराविक दिवशी बैठका घेणे व कार्यक्रम राबविणेकरीता मंकृअ व तंत्र अधिकारी यांना मदत करण्याकरीता संबधित तालुक्यातील आत्मा अंतर्गत नियुक्त केलेल्या तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (BTM) व विषय विशेषज्ञ (SMS) यांचेकडे जबाबदारी देण्यात यावी.
- विषय विशेषज्ञ यांनी सदरील शेतक-यांचे गट/समुह तयार करावे. २० शेतक-यांचा एक समुह तयार करुन त्यांचा बचत गट स्थापन करावा व बँकेमघ्ये अशा बचत गटाचे खाते उघडण्यात यावे.शक्यतो बचत गटामध्ये एका शेती पध्दतीचे शेतकरी असावेत जेणेकरुन गटाच्या कामकाजात सुसुत्रता राहील.
- प्रत्येक गटा करीता एका गट प्रमुखाची निवड करण्यात यावी.
- प्रत्येक ५ गटामध्ये एक संघटक (**Group Coordinator**) असावा.

- संघटकाची जबाबदारी त्या गावामधील शेती मित्राकडे (**Farmer Friend**) सोपवावी.
- सदरील गट प्रमुख व गट संघटक यांना महाकृषिसंचार सेवा या योजनेच्या माध्यमातुन कृषि सल्ला सेवा या योजनेचा लाभ देण्यात यावा.
- विषय विशेषज्ञाने शेती मित्राच्या सहकार्याने गटाचे कामकाज सुरळीत चालेल असे पहावे.व गटाचे प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता समन्वयकाची भुमीका पार पाडावी.
- तंत्र अधिकारी यांनी निवडलेल्या शेती पध्दतीनुसार गटातील शेतक-यांचे विविध विषयाचे प्रशिक्षणाचे वार्षिक नियोजन तयार करावे.
- यामध्ये निवडलेल्या शेतक-यांना पिक उत्पादन तंत्रज्ञानाचे ज्यामध्ये पिक लागवड पध्दती एकात्मीक अन्नद्रव्य व्यवस्थापन,एकात्मीक किड व्यवस्थापन,ठिबक सिंचन,मार्केटींग इ.विषयाच्या प्रशिक्षणाचे नियोजन करावे.
- गटामधील तरुण शेतक-यांना फलोत्पादन, भाजीपाला उत्पादन, फुलशेती, मसाला पिके, औषधी व सुंगधी वनस्पती, नियंत्रीत शेती इ. विषयाच्या प्रशिक्षणाचे नियोजन करावे.
- शेतक-याच्या कुंटुबातील महिलांना दुग्धोत्पादन,पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, प्रकीया शेळी मेंढीपालन इ.विषयाच्या प्रशिक्षणाचे नियोजन करावे.
- मंडळ कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्याचे अर्ज भरुन घेतल्यानंतर निवड केलेल्या शेती पध्दतीनुसार मार्गदर्शक सुचनामध्ये नमुद केलेप्रमाणे लाभ दयावयाच्या विविध घटकांची निश्चिती करावी.
- यामधील ज्या बाबी उपलब्ध इतर येंजनांमधुन पुर्तता करण्यासारखी आहे जसे विविध पिक योजना राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना,राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शेततळे कार्यक्रम,आत्मा यामधुन द्यावयाच्या लाभांची प्रथम निश्चिती करावी व उर्वरीत घटकांचा लाभ हा कोरडवाहु शाश्वत शेती योजनेच्या उपलब्ध घटकामधुन देण्यात यावा.
- विविध योजनामधुन व कोरडवाहू शाश्वत शेती योजनेच्या घटकामधुन द्यावयाच्या लाभाची मर्यादा ही या योजनेअंतर्गत ठरवून दिलेला **१.०० लाख** (समशितोष्ण), व (सम- आर्द्रता) **०.८०** लाख या रकमेच्या मर्यादेत राहील याची दक्षता घेण्यात यावी. **या व्यतीरिक्त हरीतगृह व शेततळे** याबाबी अतिरिक्त लाभास पात्र राहतील.
- सदर योजने अंतर्गत कृषि व कृषि सल्लग्न विभागातील योजनांचाही जास्तीत जास्त समावेश करण्यात यावा जेणेकरूण शेतक-यांच्या शेतीस निगडीत इतर बाबींचाही विचार होऊ शकेल व खरोखरीने शेतक-याच्या उत्पादन व राहणीमानामध्ये या योजनेच्या माध्यमातून अपेक्षित बदल घडू शकतो.
- सदरील गटांना/समुहांना दयावयाचे प्रशिक्षण हे आत्मा अंतर्गत उपलब्ध कृषि प्रदर्शन, शेतीशाळा व शेतकरी प्रशिक्षण इ. बाबींमधुन नियोजन करण्यात यावे.
- सोबत सुलभ संदर्भाकरीता लाभार्थी अर्ज व विविध घटकाअंतर्गत लाभ द्यावयाच्या बाबी संदर्भातील शेतक-यांची एकत्रित माहिती संबधिचे प्रपत्र सोबत जोडण्यात आले आहे.

## पर्जन्याधारीत क्षेत्र विकास कार्यक्रम.

| | | |
|---|---|---|
| १) गावांची निवड | - | १५ एप्रिल |
| २) लाभार्थी/समुह निवड | - | २५ एप्रिल |
| ३) लाभार्थ्यांना प्रशिक्षण | - | १ मे |
| ४) गावाचा प्रकल्प आराखडा (**Project Report**) | - | ५ मे पर्यंत |
| ५) माती परीक्षण | - | १५ मे |
| ६) मुलस्थानी जलसंधारण,शेततळे | - | ( खरीप हंगामपुर्व) |

| | | |
|---|---|---|
| ७) पिक पध्दती व उत्पादन तंत्रज्ञानाबाबत लाभार्थ्यांना प्रशिक्षण | - | जुन शेवटचा आठवडा |
| ८) निविष्ठा पुरवठा | - | ७ जुनपर्यंत |
| ९) प्रत्यक्ष पेरणी | - | १५ जुलै |
| १०) मध्य हंगाम प्रशिक्षण | - | १५ सप्टेंबर |
| ११) पशुधन व्यवस्थापन संबधी प्रशिक्षण | - | ऑक्टोंबर |
| १२) मुरघास बाब पुर्ण करणे | - | ऑक्टोंबर |
| १३) हरीतगृह प्रस्ताव | - | ऑक्टोंबर अखेर पुर्ण करणे |
| १४) वॉटर हार्वेस्टींग(पाणी संचयीका) स्ट्रक्चर | - | मे अखेर पुर्ण करणे |
| १५) मुलस्थानी जलसंधारण | - | रब्बी हंगाम पुर्व |

**१) शेती पध्दतीमध्ये सहाय्य**

२) मुरघास

३) बिजोत्पादन

४) मुलस्थानी जलसंधारधण

५) गांडुळखत उत्पादन

| | | |
|---|---|---|
| **१) काढणीत्तोर तंत्रज्ञान व साठवण** | — | जुन,जुलै |
| २) कृषि यांत्रिकीकरण | - | मार्च अखेर |

३) सुक्ष्म सिंचन

४) शेततळे / प्लॅस्टीक आच्छादन

५) हरीतगृह

६)मुलस्थानी जलसंधारण संदर्भी उर्वरीत बाबी.

**कृषि संचालक**
**( विस्तार व प्रशिक्षण)**
कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे -४११ ००५

-----------------

**जा.क्र/कोरडवाहूशाश्वतशेती/मासू२०१२-१३/विप्र-५/४३१/२०१२**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००५ दिनांक : ३०/०४/२०१२

प्रति,

**१) विभागीय कृषि सहसंचालक,** सर्व यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** सर्व यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**कृषि संचालक**
**( विस्तार व प्रशिक्षण)**
कृषि आयुक्तालय, म. राज्य,पुणे – ५

----------------

(Annexure - I )

# पर्जन्यआधारित क्षेत्र विकास कार्यक्रम २०१२-१३

| फोटो |
|---|

## लाभार्थी अर्ज

१. लाभार्थ्याचे नांव :

२. गांव :

३. क्षेत्र :

४. कौटुबिक माहिती

| अ.क्र | नांव | लाभार्थ्याशी नांते | स्त्री/पुरुष | वय | शैक्षणिक अर्हता | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

५. शेतक-याकडील सिंचन सुविधा : विहीर / बोअर क्षेत्र (हे.)

६. सद्याची पीक पध्दती :

| हंगाम | पिकाचे नांव | क्षेत्र (हे.) | उत्पादकता (कि./हे.) |
|---|---|---|---|
| खरीप | | | |
| रब्बी | | | |
| उन्हाळी | | | |

**७. उपलब्ध जनावरे :-**

| अ.क्रं | जनावरे | संख्या |
|---|---|---|
| १ | गाय | |
| २ | म्हैस | |
| ३ | बैल | |
| ४ | शेळी | |
| ५ | मेंढी | |
| ६ | कोंबडया | |

८. सदर योजनेंतर्गत कोणती शेती पध्दती निवडू इच्छितो
(सोबत जोडलेल्या मापदंडातील ‘अ’ अंतर्गत नमूद शेती पध्दतीमधील १ ते ५ क्रमांकापैकी योग्य शेती पध्दती निवडावी.)

| शेती पध्दती | क्षेत्र |
|---|---|
| | |
| | |

९. सोबत जोडलेल्या मापदंडातील ‘ब’ अंतर्गत शेती सुधारणा व मुल्यवर्धन बाबी अंतर्गत कोणत्या बाबी राबविण्यास इच्छुक आहेत.

१. मुरघास तयार करणे
२. बिजोत्पादन
३. हरितगृह
४. शेततळे
५. शेततळयास अस्तरीकरण
६. बोअरवेल घेणे
७. बोअरवेल पुर्नजिवन
८. पाईप लाईन
९. विद्युत पंप
१०. ठिबक सिंचन
११. गांडुळ खत उत्पादन
१२. साठवण केंद्र
१३. प्रक्रिया केंद्र
९. स्वतःच्या क्षेत्रावर राबविण्यास इच्छुक असलेल्या मुलस्थानी जलसंधारण बाबी (म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत)
१. जमीन सपाटीकरण
२. समपातळी बांध
३. सलग समतल चर
४. अर्ध चंद्राकृती बांध
५. शेततळे
६. कंपार्टमेंट बंडींग

**१०. लाभार्थी निवडीचे निकष**

१. अल्प, अत्यल्प, भूधारक, महिला व मागासवर्गीय शेतकरी.
२. पाणलोटातील माथ्याकडील बाजूचे क्षेत्रातील शेतकरी
३. कोणतीही शाश्वत पाण्याची व्यवस्था नसणारा शेतकरी.
४. मूलस्थानी जलसंधारण व शेततळे या करीता महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत काम करण्यास तयार असणारा जॉब कार्ड होल्डर

५. या योजनेअंतर्गत अपेक्षित असलेल्या शेतकरी स्वयंसहाय्यता गटामध्ये सहभागी होण्यास तयार असलेला शेतकरी.
६. शेतीपध्दतीमधील पशुपालन, दुग्धव्यवसाय फलोत्पादन, भाजीपाला उत्पादन, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, हरितगृह इ. घटकापैकी कमीत कमी दोन घटक अवलंबण्यास तयार असणारा शेतकरी.
७. सुक्ष्म सिंचन पध्दती अवलंबण्यास तयार असणारा शेतकरी .

वरील अटी मला मान्य असून विविध घटकांतर्गतच्या अनुदानाच्या मर्यादे व्यतिरिक्त लाभार्थी हिस्सा भरुन सदर योजना राबविण्यास मी तयार आहे.
माझ्या क्षेत्रावरील मुलस्थानी जलसंधारणाच्या बाबी मी म.ग्रा रो.ह.यो. अंतर्गत राबविण्यास तयार असून माझा जॉब कार्ड नंबर............. आहे.

सोबतः- जॉबकार्डची प्रमाणित प्रत.

लाभार्थीची स्वाक्षरी